# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- समग्र शिक्षा अभियान आणि दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत तीन हजार १०५ विशेष शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- बांगलादेशात अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न
- राज्यात नऊ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियान

आणि

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू विनेश फोगाटची ऐतिहासिक कामगिरी, सुवर्णपदकासाठी आज लढत

****

समग्र शिक्षा अभियान आणि दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत २००६ पासून सेवेत असणाऱ्या तीन हजार १०५ विशेष शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुंबईत काल विशेष शिक्षक पदनिर्मिती, जुनी पेन्शन योजनेसंदर्भात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली. राज्यातल्या केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षक आमदारांचा समावेश असलेल्या समितीची स्थापना देखील यावेळी करण्यात आली.

****

बांगलादेशातल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर तिथं अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला आहे. मंत्रालयानं विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. यासाठी या विद्यार्थ्यांची यादी परराष्ट्र मंत्रालयाकडे सोपवण्यात आली असून, तिथल्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी, तसंच केंद्रीय अधिकारी आणि विद्यार्थ्यांच्या कुटुंबांमध्ये समन्वय साधण्यासाठी राज्य शासनानं एक पथक स्थापन केलं आहे. बांगलादेशात अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून, या आव्हानात्मक काळात राज्य सरकार विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांबरोबर असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

****

राज्यात नऊ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा हे अभियान सर्वत्र विविध उपक्रमांनी साजरं केलं जाणार आहे. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी ही माहिती दिली. केंद्र शासनाच्या या अभियानाचं हे तिसरं वर्ष आहे. यावर्षीही तिरंगा रॅली, तिरंगा यात्रा, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा कॉन्सर्ट, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, असे विविध उपक्रम राबवण्याबाबत केंद्र सरकारनं सूचना दिल्या आहेत. या अभियानासाठी नागरिकांना शासनाकडून राष्ट्रध्वज उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल दिल्लीत दाखल झाले. या दौऱ्यात ते काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, यांच्यासह आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आदी इंडिया आघाडीच्या नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधणार असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

सेवा हमी कायद्याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करून अंमलबजावणी करावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. सेवा हमी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या पथदर्शी प्रकल्पाचं उद्घाटन येत्या १५ ऑगस्टला करण्यात येणार असून, यासंदर्भात काल झालेल्या बैठकीत ते बोलत

होते. हा पथदर्शी प्रकल्प प्रथम कोल्हापूर जिल्ह्यात आणि त्यानंतर संपूर्ण राज्यात राबवण्याची सूचनाही देसाई यांनी केली.

****

राज्यमंत्री पदाचा दर्जा असलेले राज्याच्या वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे यांनी काल जालना इथल्या नवीन मोंढातल्या रेशीम कोष बाजारपेठेची पाहणी केली. रेशीम कोष उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बाजारपेठेतल्या सुविधांबाबत त्यानी समाधान व्यक्त केलं. रेशीम कोष निर्मितीसाठी मिळणारं अनुदान, चॉकी सेंटर, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, रेशीम शेतीसोबत घेता येणारं आंतरपिक, विदर्भ आणि मराठवाड्यासाठी सर्वात जवळची रेशीम बाजारपेठ, रेशीम उत्पादनासह बाजारपेठेत विक्रस आलेल्या मोसंबी फळाची सविस्तर माहिती जाणून घेत योग्य त्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अजिंठा गावात पूलवजा बंधारा प्रकल्पाच्या पुनर्रचनेसंदर्भातली कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश, जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले आहेत. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गतच्या कामांचा सत्तार यांनी काल मंत्रालयात आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या भागात विविध योजनांसाठीच्या निविदा तातडीने काढण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

****

पॅरीस ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीच्या अंतिम फेरीत धडक मारत भारताची महिला कुस्तीपटू विनेश फोगाटनं इतिहास घडवला आहे. अशी कामगिरी करणारी ती पहिलीच भारतीय महिला कुस्तीपटू ठरली आहे. विनेशची अंतिम फेरीची लढत आज अमेरिकेच्या सारा एन हिल्डेब्रांट हिच्याशी होणार आहे. महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धेत आज मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत या खेळाडूंच्या चमूची आज जर्मनीविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीची लढत होणार आहे.

भालाफेक प्रकारात भारताच्या नीरज चोप्राने अंतिम फेरीत धडक मारली. काल झालेल्या पात्रता फेरीत नीरजने पहिल्याच प्रयत्नात सर्वाधिक ८९ पूर्णांक ३४ दशांश मीटर लांबवर भाला फेकून पहिलं स्थान निश्चित केलं. भालाफेक स्पर्धेची अंतिम फेरी उद्या आठ ऑगस्टला होणार आहे.

हॉकीमध्ये उपान्त्य फेरीत भारतीय संघाला जर्मनीकडून तीन – दोन असा पराभव पत्करावा लागला. आता कांस्यपदकासाठी भारताचा सामना स्पेन बरोबर होणार आहे. पुरुष टेबल टेनिस मध्ये उपांत्यपूर्व फेरीत काल भारताला पराभवाचा सामना करावा लागला.

****

भारत आणि श्रीलंकेदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला तिसरा सामना आज कोलंबो इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल. मालिकेत श्रीलंका एक – शून्यनं आघाडीवर आहे.

****

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव उपपरिसरासाठी देण्यात येणारा जीवन साधना पुरस्कार, प्रसिद्ध साहित्यिक तथा शिक्षणतज्ज्ञ वेदकुमार वेदालंकार यांना जाहीर झाला आहे. कुलसचिव डॉ प्रशांत अमृतकर यांनी काल ही माहिती दिली. येत्या १६ ऑगस्ट ला धाराशिव उपपरिसराच्या विसाव्या वर्धापनदिनी वेदालंकार यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचं काल सायंकाळी धाराशिवहून लातूर इथं आगमन झालं. मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दुचाकी फेरी काढून तसंच जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करून ठाकरे यांचं मोठ्या जल्लोषात स्वागत केलं. राज ठाकरे हे दोन दिवसांच्या लातूर दौऱ्यावर असून, या दौऱ्यात ते आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातल्या पदाधिकाऱ्यांची आज सकाळी बैठक घेणार आहेत.

****

नांदेड शहराजवळील झरी इथल्या खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या चार जणांचा काल बुडून मृत्यू झाला. शहरातले पाच जण या खाणीत पोहण्यासाठी उतरले होते, त्यापैकी तिघांना पोहता येत नव्हतं, यावेळी एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या मदतीनं चारही मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

लातूर इथल्या केंद्रीय राखीव पोलीस दल अर्थात सीआरपीएफच्या प्रशिक्षण केंद्रातल्या ११९ जवानांच्या तुकडीचा दीक्षांत समारंभ काल पार पडला. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे प्राचार्य अमिरूल हसन अन्सारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या वेगवेगळ्या गटातल्या जवानांचा सन्मान करण्यात आला.

****

बीड इथं शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांनी काल नगरपालिकेत ठिय्या आंदोलन केलं. शहरातल्या नागरिकांच्या मुलभूत सुविधा आणि समस्या सोडवण्यात नगरपालिका प्रशासन अपयशी ठरतं असल्यानं, हे आंदोलन करण्यात आलं. शिवसंग्रामच्या ज्येष्ठ नेत्या राष्ट्रीय अध्यक्ष ज्योती मेटे यांच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी नीता अंधारे यांना विविध मागण्यांचं निवेदन दिलं.

****

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त, छत्रपती संभाजीनगर शहरात एन आठ भागातल्या महानगरपालिका रुग्णालयात काल जनजागृती करण्यात आली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ अर्चना राणे यांच्या अध्यक्षतेखाली हा उपक्रम राबवण्यात आला. आज या सप्ताहाचा समारोप होत आहे.

****

नाशिक जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे धरण क्षेत्रातल्या पाणी साठ्यात वाढ झाली आहे. नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून सध्या १५ हजार २७४ घनफुट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या नाथसागर धरणाची पाणी पातळी १ हजार ५०३ फुटांवर पोहोचली असून, उपयुक्त पाणी साठा २२ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या ५७ हजार ३१७ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****